**उलटतपास प्रतिवादी क्र.१अ ते १क चे विधिज्ञ श्री. विलास भोजवानी यांचे मार्फत**

१०. मला माझी जन्म तारीख आठवत नाही. मी माझे अंदाजे वय ६५ वर्षे असे शपथपत्रामध्ये नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७६ साली माझे वय १४ वर्षे होते. दावा मिळकत ही माझी वडिलोपार्जित मिळकत आहे. दावा मिळकत वडिलोपार्जित असलेसंबंधात माझेकडे पुरावा आहे. माझेजवळ दावा मिळकत वडिलोपार्जित मिळकत आहे हे दर्शविण्यासाठीचा पुरावा मला शोधावा लागेल. मी माझेजवळ पुरावा आहे ते घरी शोधेन व त्यानंतर न्यायालयात दाखल करेन. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही वडिलोपार्जित आहे हे दर्शविणारा कोणताही पुरावा माझेकडे नसल्यामुळे तो मी आजतागायतपर्यंत न्यायालयात दाखल केलेला नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ भगवानदास मुलचंद नरसिंघानी यांनी दावा मिळकत खरेदी खताने दिनांक २८ जानेवारी १९७६ रोजी विकत घेतलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७६ सालापासुन दावा मिळकतीचे कधीही हस्तांतरण झाले नाही व त्याचे मालक प्रतिवादी क्र.१ हेच राहिले. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या सन १९७६ सालापासुन मालक सदरी प्रतिवादी क्र.१ भगवानदास याचे नाव सन २०१७ सालापर्यंत कायम होते. प्रतिवादी क्र.१ सन २०१७ साली मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांनी दावा मिळकतीवर त्यांचे नाव लावुन घेणेकामी कार्यवाही सुरु केली, त्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ च्या निधनानंतर त्याच्या वारसांनी वारसदार म्हणून नाव लावणे संदर्भातील मला माहिती नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे कार्यालयातुन आम्हांस नोटीस आली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हे दावा दाखल करतेवेळी मयत होते व दावा मिळकतीवर त्याचे वारसांची नावे होती ही बाब मला माहिती होती.

१२. प्रतिवादी क्र.१ च्या वारसांनी सदरच्या दाव्यात माझे विरुध्द प्रतिदावा दाखल केला आहे याबाबतची माहिती मला नाही. सदरची माहिती मला आता याक्षणी समजत आहे. माझे विधिज्ञांनी प्रतिदाव्यावर कैफियत दाखल करावयाची असलेबाबत मला सांगितल होते परंतु ते कोणत्या साली सांगितले हे मला आजरोजी आठवत नाही. साधारणतः दोन वर्षापूर्वी प्रतिदाव्यावर कैफियत दाखल करणेकामी माझे विधिज्ञांनी मला सांगितले होते. मार्च २०२३ पासुन ते आजपर्यंत मी किंवा माझे विधिज्ञ सिटी सर्वे ऑफीस मध्ये दावा मिळकती संदर्भातील माहिती करीता गेलेलो नाही. दावा

मिळकतीमध्ये दुधाचा व्यवसाय सुरु होता तसेच त्या संदर्भातील शॉप अक्ट लायसेन्स माझे आईच्या नावे होते हे दर्शविण्याकामी माझेकडे पुरावा आहे मला तो पहावा लागेल. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, दावा मिळकतीमध्ये पूर्वीपासुन गाई म्हशीचा गोठा असुन त्या ठिकाणी दुधाचा व्यवसाय आज देखील चालतो.

१३. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ भगवानदास याने दावा मिळकतीमध्ये सर्वप्रथम गोठा व दुधाचा व्यवसाय सुरु केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या वेळी मी लहान असल्यामुळे कोणताही व्यवसाय करत नव्हतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्यावेळी तो प्रतिवादी क्र.१ ला त्या गोठयामध्ये मदत करत होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याने मला घर खर्चासाठी पैसे मिळावे याकरीता त्या गोठयामध्ये मदत करण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या काळामध्ये प्रतिवादी क्र.१ हाच मोठा भाउ या नात्याने गोठा चालविणे व सर्व घरातील खर्च करणे असे करत होता. दावा मिळकतीमध्ये १५०० स्के.फुटचा गोठा असुन त्यावर आजरोजी माझा ताबा आहे.

१४. हे म्हणणे खरे आहे की, मी आजरोजी सदनिका क्र.४, एस.बी.आय.बॅंकेचेवर, या ठिकाणी राहतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, गोठयाच्या शेजारीच ही जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी दावा मिळकतीतील गोठयाचा वापर करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मला गोठयाचा १५०० स्के.फुट कायदेशिर ताबेसंदर्भात कोणताही दस्त नाही. मला दुध व्यवसायातुन सर्व खर्च जाउन दरमहा १५०००/– रुपये शिल्लक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, दुग्ध व्यवसायातुन मिळालेले उत्पन्न मी प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना दिलेले नाही. दावा मिळकतीतील गोठयामध्ये ७ गाई व ७ म्हशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सात गाई व सात म्हशी या दूध देणा–या आहेत. गाई पासुन दररोज २० ते २५ लिटर दूध मिळते तर सात म्हशीपासुन २० ते २५ लिटर दूध मिळते. गाईचे दूध ३० रुपये लिटर तर म्हशीचे दूध ५० रुपये लिटर असे विक्री करतो. माझेजवळ असलेल्या गाई आणि म्हशींची नोंदणी मी केलेली नाही. सदरचा दूध व्यवसायासंदर्भात माझा लहान भाउ प्रेम नरसिंघानी यांचे नावे शॉप अक्ट लायसेन्स आहे. सदरचे शॉप अक्ट लायसेन्स मी न्यायालयात दाखल करु शकतो. मी सदरचे शॉप अक्ट लायसेन्स दहा ते पंधरा वर्षापूर्वी काढलेले आहे. प्रेम नरसिघांनी च्या नावे शॉप अक्ट लायसेन्स दहा ते पंधरा वर्षापासुन आहे त्यापूर्वी ते माझे आईच्या नावे होते.

निशाणी क्र.४८ वरुन

१५. दावा मिळकतीमध्ये १५० चौ.फुटचे एक किराणा दुकान असुन ते दुकान माझा भाउ चंदुमल नरसिंघानी चालवितो. सदरचे किराणा दुकान ३० वर्षापूर्वी प्रतिवादी क्र.२ म्हणजे माझा भाउ चंदुमल याने बनवले आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदरचे दुकान दावा मिळकतीतील उत्पन्नातुन बनवले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमधील १५० चौ.फुट या किराणा दुकानाचा इतर कोणीही मालक नाही.किराणा दुकानाचे शॉप अक्ट लायसेन्स हे प्रतिवादी क्र.२ याचे नावे आहे. मी सदरचा लायसेन्स न्यायालयात हजर करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे किराणा दुकान हे मागील दोन वर्षापासुन बंद आहे कारण माझा प्रतिवादी क्र.२ हा बेडरिडन आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते किराणा दुकान आजरोजी बंद आहे. १५० चौ.फुट किराणा दुकानाचा ताबा प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना देण्यास आमची काहीही हरकत नाही. १५०० चौ.फुट चे गाईचा गोठा प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना देण्यास आमची हरकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, १५०० चौ.फुट गाईचा गोठा प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना देण्यास आमची हरकत आहे हा केवळ आमचा हट्ट आहे . दावा मिळकतीचे आम्ही कायदेशिर कब्जेदार असलेबाबतचा आमच्याकडे पुरावा आहे तो आम्हाला शोधावा लागेल. सदरचा पुरावा मी न्यायालयात दाखल करेन.

सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2025.10.06 12:09:30 +0530

पिंपरी, पुणे
दिनांक :–०३/१०/२०२५

(एस.एस.चव्हाण)
दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,
पिंपरी, जि. पुणे